**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १७ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी थोड्याच वेळात नवी दिल्ली इथं रायसीना संवाद २०२५ चं उद्घाटन करणार.
2. विकसित भारत, विकसित महाराष्ट्र हा राज्याच्या अर्थसंकल्पाचा मूळ गाभा - अर्थमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन.
3. राज्यात १२४ केंद्रांमार्फत १४२ कोटी ६९ लाख क्विंटल इतकी कापूस खरेदी - पणन मंत्री जयकुमार रावल यांची माहिती.
4. कामठी इथं अद्ययावत सर्व सुविधापूर्ण स्वतंत्र पोलिस उपायुक्त कार्यालय उभारले जाणार- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे.

------------------------------------

**रायसीना संवाद २०२५**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी सहा वाजता नवी दिल्ली इथं रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार आहेत. या संवादाचं हे दहावं वर्ष आहे. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन हे या संवादाच्या उद्घाटनाच्या सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील आणि उपस्थितांशी संवाद साधतील. दरम्यान, या दोन्ही प्रधानमंत्र्यांमध्ये आज नवी दिल्लीत चर्चा झाली. या चर्चेत भारत आणि न्यूझीलंड संबंधांच्या विविध पैलुंचा समावेश होता. तत्पूर्वी लक्झन यांनी आज सकाळी राजघाट इथे महात्मा गांधींच्या समाधीचं दर्शन घेऊन त्यांना आदरांजली वाहिली. यंदा रायसीना संवादाची मध्यवर्ती संकल्पना 'कालचक्र - नागरिक, शांतता आणि पृथ्वी' अशी आहे. येत्या १९ तारखेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात १२५ देशांमधून विविध क्षेत्रांमधले आघाडीचे नागरिक सहभागी होणार आहेत. यासाठी विविध देशांचे प्रतिनिधी नवी दिल्लीला पोहोचत आहेत. लक्झन यांच्या पाच दिवसांच्या दौऱ्यादरम्यान येत्या बुधवारी ते मुंबईलाही भेट देणार आहेत.

------------------------------------

**प्रधानमंत्री इंटर्नशिप**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज प्रधानमंत्री इंटर्नशिप अर्थात आंतर्वासितायोजनेसाठी (पीएमआयएस)एक समर्पित ॲपचं उद्‌घाटन करणार आहेत. इंटर्नशीप योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी नोंदणी सुलभ करून विद्‌यार्थ्यांचा सहभाग वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्‌देश आहे, येत्या २१ मार्चपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

-----------------------------------------

अर्थसंकल्पावर चर्चा

विकसित भारत, विकसित महाराष्ट्र हा आपण सादर सादर केलेल्या अर्थसंकल्पाचा मूळ गाभा आहे,असं प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज केलं. ते आज विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तरदेत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत आपलादेश विकसित राष्ट्रं करण्याचं ध्येय निश्चित केलं आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून महाराष्ट्रानेही देशाच्या प्रगतीत पूर्वीपासूनसिंहाचा वाटा उचचला आहे. त्यामुळे प्रधानमंत्र्यांनी ठरवलेलं विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही, असंही पवार यावेळी म्हणाले. महाराष्ट्र देशाच्या प्रगतीत सर्वात जास्त योगदान देणार आहे हे अर्थसंकल्पात दिसून येत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात शेती, उद्‌योग, पायाभूत सुविधा, रोजगार, कल्याणकारी योजना या पाच प्रमुख घटकांवर लक्षकेंद्रित करण्यात आल्याचंही पवार यावेळी म्हणाले.

-----------------------------------------

शिवजयंती

तिथीनुसार, शिवजयंती आज राज्यात ठीकठिकाणी साजरी करण्यात येत आहे. या निमित्तानं, शिवनेरीसह विविध गड किल्ल्यांवर शिवभक्तांकडून अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आज भिवंडी, ठाणे इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज मंदिर लोकार्पण संपन्न झाले. यावेळी फडणविसांनी उपस्थितांना संबोधित केलं....

*एक वचन तुम्हाला निश्चितपणे देतो काहीही झालं तरी या महाराष्ट्रामध्ये औरंगजेबांच्या कबरीचं महिमामंडल होऊ देणार नाही. त्याच उदात्तीकरण होऊ देणार नाही त्याच उदात्तीकरण करण्याचा प्रयन्त केला तर तो प्रयन्त त्याच ठिकाणी चिगडून टाकण्याचं काम ते आम्ही केल्याशिवाय राहणार नाही हे वचन छत्रपती शिवरायांच्या या मंदिरांच्या समोर आपल्या संवादमध्ये देतो.*

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शक्तिपीठ मंदिराच्या निर्मितीसाठी शिवक्रांती प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत म्हणाले की, आपण आपल्या इष्ट देवतांचे दर्शन घेऊ शकतो, याचे एकमेव कारण छत्रपती शिवराय आहेत.

-----------------------------------

हर्षवर्धन सपकाळ

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांची मुगल शासक औरंगजेब याच्याशी तुलना केल्याचा भाजपा नेते प्रवीण दरेकर यांनी विधानपरिषदेत निषेध केला. हा महाराष्ट्राचा अपमान असून सपकाळ यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी दरेकर यांनी केली. यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं. दरम्यान, राज्यातील कारभार क्रूर पद्धतीने सुरु आहे. त्यामुळेच आपण फडणवीस सरकारच्या कारभाराची  तुलना औरंगजेबाच्या कारभाराशी केली. व्यक्तीशी केलेली नाही, असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत व्यक्त केले. सपकाळ म्हणाले की आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख केला नाही, त्यांच्याबद्दल अपशब्द वापरला नाही तरीही भाजपाचे नेते माझ्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका करत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कारभारावर टीका केली तर मराठी अस्मितेला ठेच कशी पोहचते ते मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी सांगावे असे ते म्हणाले. कोरटकर, सोलापूरकर यांनी शिवाजी महाराजांचा अपमान केला त्यांच्यावर बावनकुळे का बोलत नाहीत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

-----------------------------------

वेव्हज

मुंबईत होत असलेल्या, वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं, ईस्पोर्ट्स स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ईस्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्यासहकार्याने आयोजित केलेल्या या ऑनलाईन स्पर्धेत ई-फुटबॉल, WCC आणि BGMI या खेळांचे सामने राष्ट्रीय स्तरावर विविध टप्प्यात होणार आहेत. अधिक माहितीकरता, वेव्हज इंडिया डॉट ओआरजी, या संकेतस्थळाला भेट देऊ शकता. वेव्हज ही जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आहे.

-----------------------------------

कापूस खरेदी-विधान सभा/परिषद

**भारतीय कापूस महामंडळामार्फत सुरू असलेली कापूस खरेदी पारदर्शकपणे व्हावी, यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असून आत्तापर्यंत राज्यात १२४ केंद्रांमार्फत १४२ कोटी ६९ लाख क्विंटल इतकी कापूस खरेदी करण्यात आली आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या संदर्भातल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. या संदर्भातील प्रश्न अमित झनक यांनी उपस्थित केला होता. कापसाच्या खरेदीसाठी भावांतर योजना लागू करावी असा आग्रह विरोधी पक्षाच्या सदस्यांनी धरला होता. खुल्या बाजारातले व्यापारी देखील या केंद्रामधून कापूस खरेदी करत आहेत त्यामुळे भावांतराचा विषय उद्‌भवत नाही. सीसीआयने लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार ५२१ रुपये हा हमीभाव दिला आहे अशी माहिती देखील रावल यांनी यावेळी दिली. सध्या अस्तित्वात असलेली ३२५ गोदामं कमी पडत असल्याने आणखीन गोदामे मिळवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. १५ मार्चपर्यंत नोंदणी झालेल्या सगळ्यांची कापूस खरेदी करण्यात येईल आणि ही मुदत वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्यात येतील असं आश्वासन रावल यांनी यावेळी दिली. दरम्यान, राज्याने सोयाबीनची विक्रमी खरेदी केल्याची माहिती रावल यांनी दिली.......**

***सोयाबीनचा हमीभाव जो आहे त्या मागच्या वर्षामध्ये 4 हजार 892 रुपये क्विंटल हा केंद्र सरकारने दिला. त्या माध्यमातून महाराष्ट्राने जवळपास 562 केंद्र उभे करून 11 लाख 21 हजार टनची खरेदी केली. तर पूर्ण देशामध्ये देशाचे पूर्ण देशाच्या सगळ्या राज्याची खरेदी जी आहे, 8 लाख 77 हजार मेट्रिक टन आणि एकट्या महाराष्ट्राची 11 लाख 21 हजार 385 मेट्रिक टन आहे.***

**शेतकऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीन खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. केंद्र सरकारच्या माध्यमातून ४ हजार ८९२ रुपये क्विंटल य दराने ५६२ केंद्रांद्‌वारे ११ लाख २१ हजार टन सोयाबीन खरेदी झाल्याचं त्यांनी सांगितलं. पुन्हा सोयाबीन खरेदी सुरू करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आल्याचं ते म्हणाले.**

---

**चंद्रशेखर बावनकुळे**

**कामठी शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असून, या विस्ताराला योग्य सुरक्षा व दिशा देण्याच्या दृष्टीने, अद्‌ययावत सर्व सुविधापूर्ण स्वतंत्र पोलिस उपायुक्त कार्यालय उभारले जाणार आहे. या कार्यालयात कामठीतील सर्व**

**सीसीटीव्ही कॅमे-याचे कंट्रोल रूम, वॉर रूम, एसीपी कार्यालय, पोलिस स्थानक, पार्किंगच्या सुविधेसह आदर्श ठरेल, या पद्धतीने नियोजन करण्याचे निर्देश, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.**

**-------------------------------------**